जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३८० दिनांक - १६/०९/२०२४

सहकारनगर पोलीस स्टेशन

### रात्रीच्या वेळी चालत जाणा-या नागरिकांना चाकुचा धाक दाखवुन जबरदस्तीने मोबाईल हिसकवणारे ४ विधीसंघर्षीत बालक ताब्यात

दि.१०/०९/२०२४ रोजी फिर्यादी हे पुणे सातारा रोड येथील डी-मार्टचे चौकात ट्रॅव्हल्स मधून उतरून डी मार्टचे समोर मित्राची वाट पाहत थांबले असता.त्यावेळी अचानक पाठीमागुन एका मोपेड दुचाकीवर चार अनोळखी इसम आले व फिर्यादी यांना चाकुचा धाक दाखवुन हातातील मोबाईल फोन व बॅग जबरदस्तीने हिसकावुन घेतली.व इतर दोन साथीदारांनी पॅन्टचे खिशातील रक्कम जबरदस्तीने काढुन घेतली. त्याबाबत **सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.नं.२९९/२०२४ भारतीलय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९(४), ३(५)** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दिनांक १५/०९/२०२४ रोजी सदर दाखल गुन्हयाचा तपास वरिष्ठ पालीस निरीक्षक छगन कापसे यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे तपास करित असताना पोलीस अंमलदार महेश मंडलीक व अमित पदमाळे यांना त्यांच्या बामतीदाराकडून बातमी मिळाली की सदर गुन्हा करणारे इसमापैकी एक इसम हा डायस प्लॉट गुलटेकडीचे कॅनलवर थांबलेला आहे.त्यास ताब्यात घेवुन त्याच्या कडे सदर गुन्हयाच्या अनुशंगाने तपास केला असता सदर विधीसंघर्षीत बालकाने सदरचा गुन्हा त्याचे इतर तिन विधीसंघर्षीत बालकां सोबत मिळुन केल्याचे कबुल केल्याने तीन विधीसंघर्षीत बालकांना पिंपरी येथुन ताब्यात घेवुन त्यांचे कडुन चोरीस गेलेला मोबाईल तसेच गुन्हयात वापरलेला चाकु व एक दुचाकी गाडी तसेच विविध कंपनीचे इतर चार मोबाईल असे **एकुण २,६८,२००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त** करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील , मा. सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग श्रीमती नंदिनी वग्यानी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. छगन कापसे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) उत्तम भजनावळे यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे सहा पोलीस निरीक्षक सागर पाटील, सहा.पोउपनिरी बापु खुटवड, पोलीस अंमलदार महेश मंडलिक,अमित पदमाळे, अमोल पवार, किरण कांबळे, विशाल वाघ , बजरंग पवार, चंद्रकांत जाधव, सागर सुतकर, खंडु शिंदे,योगेश ढोले,महेश भगत, सागर कुंभार यांनी केली आहे.